जय जिजाऊ !



रौप्य महोत्सवी वर्ष

सन २०२४-२५

जय शिवराय !






आम्ही जपतो आपुलकी, विश्वास आणि श्रमाचा पैसा!

मराठा सेवा संघ प्रणीत

# अहिल्यानगर जिल्हा मराठा पतसंस्था

## अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर

रजि. नं. एनआर/आरएसआर/सीआर/२८९७/२००० दि. २१/१०/२०००

**संस्थापक अध्यक्ष : इंजि. डॉ. विजयकुमार ठुबे** **ऑडिट वर्ग - अ**

मुख्य कार्यालय : मराठा सांस्कृतिक भवन, जिजाऊमार्ग, बारातोटी कारंजा, अहिल्यानगर फोन :०२४१-२३५४९०७

# २५ वा वार्षिक अहवाल २०२४-२०२५

# भावपूर्ण आदरांजली



निधन दि. १२/११/२०२४

## स्मृतिशेष शोभाताई बाबासाहेब जाधव

जिजाऊ ब्रिगेड, माजी जिल्हाध्यक्षा व मराठा पतसंस्थेच्या माजी संचालिका



निधन दि. १३/०९/२०२५

## स्मृतिशेष प्रल्हादराव हनुमंतराव शितोळे

माजी अतिरिक्त संचालक, समाज कल्याण विभाग तथा
मराठा सेवा संघाचे व मराठा पतसंस्थेचे ज्येष्ठ सल्लागार

## जिजाऊ वंदना

जिजा माऊली गे, तुला वंदना ही ।
तुझ्या प्रेरणेने, दिशा मुक्त दाही ॥१॥

भयातून मुक्ती, मिळाली जनांना ।
गुलामी कुणाला, कुणाचीच नाही ॥२॥

नसे दुःख कोणा, नसे न्यून कोणा ।
फुलांना मुलांना, नसे दैन्य काही ॥३॥
जिजा माऊली गे...

जशी पार्वती ती, प्रिया शंकरास ।
तशी प्रेरिका गे, शहाजींस तूही ॥४॥

जसा संविभागी, बळी पूर्वकाळी ।
शिवाजी जनांच्या, तसे विदेही ॥५॥
जिजा माऊली गे....

तुझ्या संस्कृतीने, तुझ्या जागृतीने ।
प्रकाशात न्हाली, मने ही प्रवाही ॥६॥

तुला वंदिताना, सुखी अंग अंग ।
खरा धर्म आता, शिवाचाच पाही ॥७॥

खरा धर्म आता, शिवाचाच पाही...
जिजा माऊली गे...

प्रकाशक : शिवधर्म संसद
दि : ०१/०३/२०२१

## भावपूर्ण आदरांजली...

अहवाल सालात जे थोर स्वातंत्र्यसेनानी, भारतीय व जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ, थोर साहित्यिक, कलावंत, राजकीय, सामाजिक व सहकारी चळवळीतील कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, सेनादलातील सैनिक, तसेच आपल्या संस्थेच्या मा.संचालिका स्मृतिशेष शोभाताई बाबासाहेब जाधव, प्रल्हादराव हनुमंतराव शितोळे,तसेच संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक दिवंगत झालेत, त्यांच्या स्मृतीस आम्ही आदरपूर्वक अभिवादन करून त्यांना कृतज्ञतापूर्वक भावपूर्ण आदरांजली अर्पण करीत आहोत.

**चेअरमन, व्हा. चेअरमन,
संचालक मंडळ, सल्लागार मंडळ,
सभासद व कर्मचारी वृंद.**

आशीर्वाद



स्मृतिशेष शिवभक्त परायण शिवदास महाराज
पंढरपूर

आशीर्वाद



शिवभक्त परायण बद्रीनाथ महाराज तनपुरे
पंढरपूर

प्रेरणास्थान



शिवश्री ॲड. पुरुषोत्तम खेडेकर
संस्थापक अध्यक्ष,मराठा सेवा संघ

संस्थापक अध्यक्ष



शिवश्री इंजि. डॉ. विजयकुमार ठुबे
चेअरमन



पत्रकार शिवश्री किशोर मरकड
मा. व्हा. चेअरमन
(दि.८/१/२०२५ पर्यंत)



शिवश्री बाळकृष्ण काळे
व्हा. चेअरमन
(दि.९/१/२०२५ पासून)

# संचालक मंडळ



लक्ष्मण सोनाळे
मा. व्हा. चेअरमन
शाखाध्यक्ष, पाथर्डी शाखा



ज्ञानदेव पांडुळे
मा. चेअरमन
शाखाध्यक्ष, मार्केटयार्ड शाखा



ॲड. राजश्री शितोळे
मा. व्हा. चेअरमन
शाखाध्यक्ष, भिंगार शाखा



सतीश इंगळे
मा. व्हा. चेअरमन
शाखाध्यक्ष, माळीवाडा शाखा



प्रा. किसन पायमोडे
शाखाध्यक्ष, कर्जत शाखा



कालिदास शिंदे
शाखाध्यक्ष, कर्जत शाखा



ॲड. काशिनाथ डोंगरे
शाखाध्यक्ष, संगमनेर शाखा



उदय अनभुले
शाखाध्यक्ष, भिंगार शाखा



इंजि.संभाजी मते
शाखाध्यक्ष, नेवासा शाखा



द्वारकाधीश राजेभोसले
शाखाध्यक्ष, माळीवाडा शाखा



इंजि. बाळासाहेब सोनाळे
शाखाध्यक्ष, पाथर्डी शाखा



प्रा.डॉ. कल्पना ठुबे



ॲड. राजेश कावरे



निवृत्ती रोहोकले
तज्ज्ञ संचालक



सुनिल जाधव
तज्ज्ञ संचालक



अशोक वारकड
मुख्य कार्यकारी अधिकारी

# कर्मचारीवृंद


बबन सुपेकर
सह. व्यवस्थापक


गोरख काटे
सह. व्यवस्थापक


अशोक अरगडे
शाखाधिकारी


अनुपमा भापकर
शाखाधिकारी


प्रितेश बोरुडे
शाखाधिकारी


महेशकुमार नलवडे
शाखाधिकारी


पुष्पा इंगळे
शाखाधिकारी


गणेश खोर्दे
प्र. शाखाधिकारी


संतोष पारखे
प्र. शाखाधिकारी


कांता जाधव
प्र. शाखाधिकारी


रणजित रकटाटे
लेखाधिकारी


कविता ढोणे
कनिष्ठ लिपिक


सूर्यकांत कडू
कनिष्ठ लिपिक


दीपमाला पवार
कनिष्ठ लिपिक


प्रभाकर जेधे
कनिष्ठ लिपिक


दिलीप खर्डे
कनिष्ठ लिपिक


मंजुश्री गुंजाळ
कनिष्ठ लिपिक


प्रशांत बोरुडे
कनिष्ठ लिपिक


रोहिणी मुळे
कनिष्ठ लिपिक


शुभम केसभट
कनिष्ठ लिपिक


रोहन सातपुते
कनिष्ठ लिपिक


निलेश जाधव
कनिष्ठ लिपिक


तेजस कासार
कनिष्ठ लिपिक


मनेश रोहोकले
सहाय्यक


अक्षय डोंगरे
सहाय्यक




राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब जन्मोत्सवानिमित्त अभिवादन...





शिवजयंती व पतसंस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त अभिवादन करताना...



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अभिवादन...



शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अभिवादन...



छत्रपती संभाजी महाराज जयंती व भिंगार शाखा वर्धापनदिनानिमित्त अभिवादन...



हुतात्मा छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांना अभिवादन करताना.





संस्थापक अध्यक्ष इंजि.डॉ. विजयकुमार ठुबे यांना लोकमत महाराष्ट्र रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल व संचालक उदय अनभुले यांची भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना.



स्मृतिशेष मा.आ. अरुणकाका जगताप यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना.




संगमनेरचे आमदार अमोलभाऊ खताळ यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना.



सहकार दिनानिमित्त गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेच्या संस्थापिका चेअरमन आशाताई भांगरे यांचा सन्मान करताना.



शिक्षकदिनानिमित्त राजीव गांधी विद्यालय, निमजचे मा.प्रा. शांताराम डोंगरे यांचा सन्मान करताना.



बाबासाहेब मुळे यांची न्यू इंग्लिश स्कूल, शेंडी मुख्याध्यापकपदी नियुक्तीबद्दल सत्कार करताना.



महात्मा ज्योतिबा फुले नॅशनल आवार्ड, अखिल भारतीय दलित साहित्य अॅकॅडमी, दिल्ली



जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने इंजि. सुजाताताई व इंजि.डॉ. विजयकुमार ठुबे यांचा आदर्श दाम्पत्य पुरस्काराने मानपत्र देऊन गौरव करताना.



मराठा सेवा संघ व मराठा पतसंस्था आयोजित जीवनगौरव पुरस्कार सोहळा दीपप्रज्वलन प्रसंगी, आ.संग्रामभैय्या जगताप, जीवन गौरव पुरस्कारार्थी प्राचार्य शिवाजीराव देवढे सर,रजनीताई गोंदकर, युवा उद्योजक भाऊसाहेब जंजिरे, ॲड. जयंत जाधव, शंभु गिरवले...



मराठा सेवा संघाच्या वर्धापनदिनानिमित्त बालघर प्रकल्पातील मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करताना



शिवजयंती उत्सव व रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पणानिमित्त विविध योजनांचा शुभारंभ करताना.



पाथर्डी शाखेचे नवीन प्रशस्त जागेत स्थलांतर सोहळाप्रसंगी उद्घाटन करताना आ. मोनिकाताई राजळे



नेवासा शाखा वर्धापनदिनानिमित्त अभिवादन सोहळा व गुणगौरव समारंभ



जिजाऊ माँ साहेब स्मृतिस्थळ मातृतीर्थ सिंदखेडराजा ते पाचाड (रायगड) अभिवादन यात्रेचे स्वागत करताना



स्वातंत्र्यदिनानिमित्त झेंडावंदन कार्यक्रम



संस्थापक अध्यक्ष इंजि. डॉ. विजयकुमार ठुबे यांना लंडन येथे लोकमत महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करताना
विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर व अभिनेते सुनील शेट्टी समवेत इंजि. सुजाता ठुबे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील




महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात स्थापत्य अभियंता म्हणून ३६ वर्षे दिलेल्या योगदानाबद्दल आणि
मराठा सेवा संघाच्या सामाजिक कामाबद्दल अमेरिका येथील साऊथ वेस्टर्न अमेरिका युनिव्हर्सिटी यांच्यातर्फे दिली जाणारी
डॉक्टरेट ही पदवी इंजि. विजयकुमार ठुबे यांना चन्नई येथे प्रदान करण्यात आली.

• प्रकाशक •

**शिवश्री बाळकृष्ण मारूती काळे** (व्हा. चेअरमन)

अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर

7768012484 | YouTube | Follow us :




मराठा सेवा संघ प्रणीत

# अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर

रजि.नं.एनआर/आरएसआर/सीआर/२८९७/२००० दि. २५/१०/२०००

अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर

मराठा सांस्कृतिक भवन, जिजाऊ मार्ग, बारातोटी कारंजा, अहिल्यानगर. फोन : (०२४१) २३५४९०७

जा. क्र. अ.जि.म.से.ना.सह. पतसंस्था/ अधिमंडळाची बैठक /६५ /२०२५ दि. १६/०९/२०२५

## अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीचे सूचनापत्र
(फक्त सभासदांकरिता)

अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २५ वी अधिमंडळाची वार्षिक बैठक **मंगळवार, दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २ :०० वाजता कोहिनूर मंगल कार्यालय, पारिजात चौक, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे संस्थापक अध्यक्ष, चेअरमन शिवश्री इंजि. डॉ. विजयकुमार गोविंदराव दुबे यांच्या** अध्यक्षतेखाली खालील विषयांच्या कामकाजाकरिता आयोजित केली आहे. कृपया सर्व सभासदांनी बैठकीस उपस्थित राहावे, ही विनंती.

## बैठकीपुढील विषय

१. दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.
३. वैधानिक लेखापरीक्षकांच्या लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
५. गतवर्षीच्या अंदाजपत्रकातील खर्चाची आणि पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकाची माहिती देणे आणि मान्यता घेणे.
६. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
७. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
८. महाराष्ट्र शासनाच्या सामोपचार परतफेड योजनेअंतर्गत व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अन्वये वसुली दाखल्यातील हुकुमानुसार सवलत दिलेल्या थकित कर्जखात्यांची नोंद घेणे.
९. सन २०२३-२०२४ मधील वैधानिक लेखापरीक्षण दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
१०. संस्थेच्या माळीवाडा शाखेचे स्थलांतर करणेबाबत विचारविनिमय करणे.
११. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील पतसंस्थेचे आपल्या पतसंस्थेमध्ये विलीनीकरण करणेबाबत विचारविनिमय करणे.
१२. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाने सुचविलेली सुधारित आदर्श उपविधी स्वीकारणेबाबत विचारविनिमय करणे.
१३. मा. अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
अशोक बापूराव वारकड
मुख्य कार्यकारी अधिकारी
अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी
सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर

**स्थळ : अहिल्यानगर**
दिनांक : १६/०९/२०२५

**टीप :** १) कोरमअभावी बैठक तहकूब झाल्यास, त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून बैठकीचे कामकाज सुरू करण्यात येईल. तहकूब झालेल्या बैठकीस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांना अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीपुढे असलेल्या विषयासंबंधी माहिती पाहिजे असल्यास, तसेच काही प्रश्न अगर सूचना द्यावयाच्या असल्यास दि. २५/०९/२०२५ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात लेखी स्वरूपात द्याव्यात.
३) सभासद शिक्षण कार्यक्रम बैठकीच्या ठिकाणी सकाळी ११:३० वाजता आयोजित केला आहे.
४) गुणगौरव समारंभ बैठकीच्या ठिकाणी सकाळी १०:३० वा. आयोजित केला आहे.
५) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाने सुचविलेली सुधारित आदर्श उपविधी संस्थेच्या मुख्य कार्यालयात व शाखा कार्यालयास पाहवयास उपलब्ध आहे.






## * गुणगौरव समारंभ *

मराठा समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेले समाजबांधव व भगिनी, तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व विविध क्षेत्रांत विशेष प्रावीण्यप्राप्त गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी व गुणवंतांचा मराठा सेवा संघ व मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर यांच्या वतीने मान्यवरांच्या शुभहस्ते गुणगौरव समारंभ **मंगळवार दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता कोहिनूर मंगल कार्यालय, सावेडी, अहिल्यानगर येथे आयोजित केलेला आहे.** तरी सर्व समाजबांधवांनी या समारंभास उपस्थित राहावे.

या समारंभासाठी विविध क्षेत्रांत विशेष प्रावीण्य मिळविलेले समाजबांधव, तसेच एस.एस.सी. (दहावी) परीक्षेत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त व एच.एस. सी.(बारावी) परीक्षेत ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी, प्रज्ञाशोध परीक्षा, शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा, एम. पी. एस. सी., यू. पी. एस. सी., मेडिकल, इंजिनिअरिंग व विविध परीक्षांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवलेले विद्यार्थी, विद्यार्थिनी त्याचप्रमाणे सर्व शाखांचे पदवी व पदव्युत्तर परीक्षा शेकडा ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व विद्यार्थिनी, तसेच कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रांत जिल्हा, राष्ट्रीय व राज्य पातळीवर प्रावीण्य मिळविलेले विद्यार्थी व विद्यार्थिनींनी किंवा त्यांच्या पालकांनी अधिकृत प्रमाणपत्र व गुणपत्रिकाच्या छायांकित प्रतीसह तसेच स्वतःचा पत्ता व **फोन नंबरसह दि.२५ सप्टेंबर २०२५ पर्यंत मराठा पतसंस्थेच्या खालील व्हॉटसॲप नंबरवर अथवा मुख्य कार्यालयात पाठवावी.**

**Whatsapp No. 7768012484**

| इंजि.डॉ.विजयकुमार ठुबे | बाळकृष्ण काळे | इंजि.सुरेश इथापे |
|---|---|---|
| संस्थापक अध्यक्ष, चेअरमन | व्हा.चेअरमन | जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ, अहिल्यानगर |

## सभासदांना नम्र आवाहन

आपण आपल्या संस्थेचे सन्माननीय सभासद आहात. संस्थेच्या कामकाजाबाबतची विस्तृत माहिती आपणाकडे दरवर्षी येत असलेल्या वार्षिक अहवालातून मिळत असतेच. संस्थेची आर्थिक स्थिती सक्षम असल्यामुळे संस्था स्थापन झाल्यापासून सर्व सभासदांना लाभांश देतच आहे. म्हणजे गेली २४ वर्षे ७% ते १०% दराने आजपर्यंत कमाल १७६% परतावा लाभांश रूपाने आपणांस दिलेला आहे. उदा. जर आपला रू. १०००/- चा भाग / शेअर्स असेल तर त्यावर आजपर्यंत कमाल १७६०/- एवढा परतावा लाभांशाच्या रूपाने आपणास मिळालेला आहे. संस्थेच्या आर्थिक भक्कमतेच्या जोरावर भविष्यात १५% लाभांश देण्याचा मानस मा. संचालक मंडळाचा आहे आणि तो आम्ही निश्चितच पूर्ण करू. संस्थेच्या असणाऱ्या भक्कम आर्थिक स्थितीचा विचार करताना शासनाने खास बाब म्हणून आपल्या संस्थेस रु. ५ लाखांपर्यंत सभासदांना भाग/शेअर्स धारण करण्यास मंजुरी दिलेली आहे. याचा विशेष उल्लेख करावासा वाटतो.

याच योजनेचा भाग म्हणून संस्थेच्या मा. संचालक मंडळ यांनी **सभासद संपर्क अभियानाच्या** माध्यमातून संस्थेच्या वसूल भागभांडवलामध्ये वाढ करण्याची अभियान आखलेले आहे. तरी प्रत्येक सभासदांनी आपल्या असलेल्या भागामध्ये/शेअर्समध्ये किमान रु. १०००/- चे ज्यादा भागभांडवल घ्यावे असे आवाहन या निमित्ताने आपणास करित आहोत. विशेष बाब म्हणजे आपण संस्थेचे सभासद असल्याने आपणांस मिळणाऱ्या लाभांशावर आयकरामध्ये देखील सवलत आहे. तरी या योजनेस प्रतिसाद देऊन आतापर्यंत संस्थेस दिलेले सहकार्य यापुढे ही असे वृद्धिंगत करावे.






# सल्लागार मंडळ

❊ **मुख्य कार्यालय** – शिवश्री सुरेश कोंडीराम इथापे (जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ), शिवश्री राजेश गणपत परकाळे (जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड), शिवमती संपूर्णा किसन सावंत (जिल्हाध्यक्षा, जिजाऊ ब्रिगेड ), शिवश्री प्रा. खासेराव हणुमंत शितोळे, शिवश्री प्रा. पोपटराव मारुती काळे, शिवश्री निवृत्ती माधवराव कोल्हे, शिवश्री डॉ. शरद गोविंदराव ठुबे, शिवश्री राजेंद्र मारुती ससे, शिवश्री मच्छिंद्र मल्हारी तांबे, शिवश्री राधाकृष्ण वाळुंज, शिवश्री रवींद्र सुधाकर देशमुख, शिवश्री सुदाम लक्ष्मण मडके, शिवश्री ज्ञानदेव निवृत्ती रोहकले, शिवश्री शामराव नामदेव कुलट, शिवश्री अशोक पांडुरंग कुटे, शिवश्री प्रशांत सुरेश नेटके. उद्योजक शिवश्री नवनाथ धुमाळ, शिवश्री प्रा. एल. बी. म्हस्के, सी. ए. राजेश काळे

❊ **मार्केटयार्ड, अहिल्यानगर शाखा** – शिवश्री तारकराम सीताराम झावरे, शिवश्री विनायक कृष्णाजी गरड, शिवश्री दत्तात्रय किसन ठुबे, शिवश्री चंद्रकांत मुळे, शिवश्री धर्मेंद्र दशरथ गीते, शिवश्री अतुल बाबुराव लहारे, शिवश्री दत्ता साठे, शिवश्री गोवर्धन पांडुळे, शिवश्री यशवंत धोंडीराम कदम, शिवश्री दौलत उत्तम मुठे, शिवश्री अमित धामणे

❊ **भिंगार शाखा** – शिवश्री कानिफनाथ नामदेव कासार, शिवश्री बेरड अर्जुन रामभाऊ, शिवश्री मोहिते कैलास गंगाधर, शिवश्री सपकाळ संजय माधवराव, शिवश्री वाघस्कर कोंडीराम दशरथ, शिवश्री बोबडे संतोष बन्सी, शिवश्री कराळे रमेश फकिरराव, शिवश्री बेरड मच्छिंद्र रामभाऊ, शिवश्री कर्डिले सुनिल (भाऊ) कांतीलाल, शिवश्री लांडगे राजेंद्र भाऊसाहेब, शिवश्री तनपुरे अनिल भागचंद, शिवश्री गणेश भोजराज साठे, शिवश्री वाघस्कर कैलास विष्णू, शिवश्री कडूस राजेंद्र अरुण, शिवश्री वाघस्कर अमोल मच्छिंद्र, शिवश्री वाघस्कर गणेश दिलीप, शिवश्री लांडगे अविनाश भीमाशंकर, शिवश्री मोरे नवनाथ सुदाम

❊ **संगमनेर शाखा** – शिवश्री डॉ. माणिक पंढरीनाथ शेवाळे, शिवश्री चंद्रभान शंकर नवले, शिवश्री गवराम विठोबा रहाणे, शिवश्री काशीनाथ नामदेव हांडे, शिवश्री बाळासाहेब जगन्नाथ आमटे, शिवश्री भास्कर दशरथ खताळ, शिवश्री प्रकाश संपत रहाणे, शिवश्री शांताराम माधव घुले, शिवश्री प्रवीण अरुण कानवडे, शिवमती मथुराबाई बिभिषण भोसले, शिवमती संगीता वसंतराव गायकवाड, शिवमती संजना संदीप शेळके.

❊ **नेवासा शाखा** – शिवश्री परशुराम मोहनीराज मते, शिवश्री रावसाहेब सदाशिव घुमरे, शिवश्री राजेश दत्तात्रय जगताप, शिवश्री रघुनाथ किसन आगळे, शिवश्री त्र्यंबक काशीनाथ सुकाळकर, शिवश्री अशोक मोहन साळुंके, शिवश्री बाळासाहेब बाबुराव देवखिळे, शिवश्री किशोर श्रीपती भणगे, शिवश्री पी.आर. जाधव, शिवश्री महेश विष्णू निपुंगे, शिवश्री मुरलीधर देवराव मते, शिवश्री जनार्धन नाथू हारदे, शिवमती शारदा रघुनाथ वांढेकर, शिवश्री चंद्रकांत नारायण काळे, शिवश्री बबन कवरू पवार, प्रा.डॉ.शिवश्री किशोर गजानन धनवटे, शिवश्री रेवणनाथ जयवंत शेळके, ॲड. वसंत तुकाराम नवले, ॲड. सुरेखा भाऊसाहेब टेमक

❊ **पाथर्डी शाखा** – शिवश्री नामदेव सदाशिव लबडे, शिवश्री बबनराव नानासाहेब जेधे, शिवश्री बापुसाहेब बबनराव कल्हापुरे, शिवश्री डॉ. बाळकृष्ण देवराम मरकड, शिवश्री योगेश सोपानराव वाकचौरे, शिवश्री प्रशांत विक्रम शेळके, शिवश्री सर्जेराव धोंडीराम काकडे, शिवश्री सूर्यकांत दत्तू बोरुडे, शिवश्री विजय शेषराव वितळे, शिवश्री ॲड. चंद्रकांत नामदेव सातपुते, शिवश्री डॉ. राहुल शिवाजी देशमुख, शिवश्री पुरुषोत्तम राम कचरे, शिवश्री रवींद्र नामदेवराव मरकड, शिवश्री बाळकृष्ण आसाराम शेळके, शिवश्री सुवर्णा बाळासाहेब कोकाटे, शिवमती शोभना पांडुरंग काकडे, शिवश्री रावसाहेब बाबुराव मोरे

❊ **शेवगाव शाखा**– शिवश्री विजय भास्करराव देशमुख, शिवश्री शिवाजीराव अंबादास देवढे, शिवश्री विक्रमराव रावसाहेब दारकुंडे, शिवश्री राजेंद्र पोपटराव झरेकर, शिवश्री प्रमोद नारायण बोडखे, शिवश्री निलेश प्रमोद बोडखे, शिवश्री सतीश जमतराव मरकड

❊ **कर्जत शाखा**– शिवमती जंजीरे हेमलता भाऊसाहेब, शिवश्री काळदाते रामदास नाना, शिवश्री तनपुरे युवराज विनायक, डॉ. तोरडमल राम केशव, शिवश्री देशमुख अमीत बाळासाहेब, शिवश्री धनवडे पांडूरंग किसन, शिवश्री शेळके नवनाथ श्रीरंग, शिवश्री पठाडे राजेंद्र ज्ञानदेव, शिवश्री घालमे बाळासाहेब नाथू, शिवश्री सपकाळ बाळासाहेब माधव, शिवश्री नांगरे संभाजी तुकाराम.

❊ **कायदेशीर सल्लागार** – ॲड. माणिकराव मोरे, ॲड. शेखर दरंदले, ॲड. रवींद्र शितोळे, ॲड. विलास गरड, ॲड. भगवंत काळे, ॲड. संदीप खांदवे, ॲड. प्रदीप कर्डिले, ॲड. शिवाजी कराळे, ॲड. शिल्पा बेरड, ॲड. अनुराधा येवले, ॲड. कृष्णा झावरे, ॲड. अशोक गुंडपाटील, ॲड. नितीन काळे, ॲड. नितीन अडसुरे, ॲड. दादाभाऊ वर्पे, ॲड. प्रियंका औटी, ॲड. मधुकर भांगरे, ॲड. साहेबराव गोविंदराव चौधरी, ॲड. कृष्णा मोटे, ॲड. गौरव दांगट, ॲड. सुरेश लगड, ॲड. राजाभाऊ शिर्के, ॲड. विजय गवांदे, ॲड रेणूका कोकाटे, उच्च न्यायालय – ॲड. शिवाजी शेळके, ॲड. नितीन गवारे, ॲड. अभिजीत मोरे, ॲड. दत्ता नागोडे

❊ **गोल्ड व्हॅल्युअर माळीवाडा व मार्केटयार्ड शाखा** – प्रियांक बेल्हेकर, **भिंगार शाखा** – अशोक अंबिलवादे, **नेवासा शाखा** – विजय दहीवाळकर, **पाथर्डी शाखा**– अरविंद जोजारे, **संगमनेर शाखा** – महेश मयूर, बेंद्रे अमित मदनराव **शेवगाव** – राजेंद्र पंडित

❊ **प्रॉपर्टी व्हॅल्युअर** – इंजि.आबासाहेब कर्डिले, इंजि. डी. ई. भगत, इंजि. मनिष गुळवे, इंजि. बाळासाहेब मिसे.






## * संचालक मंडळ *

| | | |
|---|---|---|
| १ | शिवश्री इंजि. डॉ. विजयकुमार गोविंदराव ठुबे (B.E. Civil, M.Sc.) | संस्थापक अध्यक्ष, चेअरमन |
| २ | शिवश्री बाळकृष्ण मारुती काळे (B.Com.) | व्हा.चेअरमन |
| ३ | शिवश्री पत्रकार किशोर मोहनराव मरकड (B.Com., B.C.J.) | संचालक |
| ४ | शिवश्री लक्ष्मणराव भानुदास सोनाळे (B.A) | संचालक |
| ५ | शिवश्री ज्ञानदेव दत्तात्रय पांडुळे (B.A) | संचालक |
| ६ | शिवमती ॲड. राजश्री रवींद्र शितोळे (B.A.,L.LB. (II) ) | संचालिका |
| ७ | शिवश्री सतीश शंकरराव इंगळे (M.Com.) | संचालक |
| ८ | शिवश्री प्रा. किसन सखाराम पायमोडे M.A.(I), DHE (I) | संचालक |
| ९ | शिवश्री यशवंत(कालिदास) जयवंतराव शिंदे (D.Pharm.) | संचालक |
| १० | शिवश्री ॲड. काशिनाथ कुंडलिक डोंगरे (M.Com., GDC&A,LLB) | संचालक |
| ११ | शिवश्री ज्ञानेश्वर (उदय) भाऊसाहेब अनभुले (B.Com., M.S.W) | संचालक |
| १२ | शिवश्री इंजि.संभाजी मोहनीराज मते (सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता पाटबंधारे विभाग) | संचालक |
| १३ | शिवश्री द्वारकाधीश उत्तमराव राजेभोसले (B.Com.,M.B.A.) | संचालक |
| १४ | शिवश्री इंजि. बाळासाहेब दशरथ सोनाळे D.(E&T/C)E | संचालक |
| १५ | शिवमती प्रा. डॉ. कल्पना शरद ठुबे (M.D. Homoeopathy) | संचालिका |
| १६ | शिवश्री ॲड. राजेश दत्तात्रय कावरे (B.A. L.L.B.) | संचालक |
| १७ | शिवश्री निवृत्ती (बबनराव)ज्ञानदेव रोहोकले (B.A.) | तज्ञ संचालक |
| १८ | शिवश्री सुनिल नरसिंह जाधव (B.A.) | तज्ञ संचालक |
| १९ | शिवश्री अशोक बापुराव वारकड (B.A., B.Com., G.D.C. & A.) | मुख्य कार्यकारी अधिकारी |







## कर्मचारी वृंद

| | | |
|---|---|---|
| १ | शिवश्री बबन बाबुराव सुपेकर B.Com., G.D.C.&A. | सह. व्यवस्थापक |
| २ | शिवश्री गोरख रामदास काटे M.A. | सह. व्यवस्थापक |
| ३ | शिवश्री अशोक रामनाथ अरगडे B.Com., G.D.C.&A. | शाखाधिकारी - संगमनेर शाखा |
| ४ | शिवमती अनुपमा बापुसाहेब भापकर B.A., D.C.M. | शाखाधिकारी - मार्केटयार्ड शाखा |
| ५ | शिवश्री प्रितेश रेवन्नाथ बोरुडे B.A., D.C.M. | शाखाधिकारी - भिंगार शाखा |
| ६ | शिवश्री महेशकुमार आसाराम नलवडे M.Sc., G.D.C.& A. | शाखाधिकारी - शेवगाव शाखा |
| ७ | शिवमती पुष्पा विनायक इंगळे M.A.,B.Ed. | शाखाधिकारी - माळीवाडा शाखा |
| ८ | शिवश्री संतोष रघुनाथ पारखे M.A., M.Ed. | प्र. शाखाधिकारी - नेवासा शाखा |
| ९ | शिवश्री गणेश विष्णू खोर्दे B.A. | प्र. शाखाधिकारी - पाथर्डी शाखा |
| १० | शिवमती कांता संजय जाधव B.Com., G.D.C.&A. | प्र. शाखाधिकारी - कर्जत शाखा |
| ११ | शिवश्री रणजित हरिभाऊ रकटाटे M.Com., G.D.C.&A. | लेखाधिकारी - माळीवाडा शाखा |
| १२ | शिवमती कविता राजेंद्र ढोणे D.Ed., B.A. (Appeared) | कनिष्ठ लिपिक - माळीवाडा शाखा |
| १३ | शिवश्री सूर्यकांत मारुती कडू B.Sc. G.D.C.&A. | कनिष्ठ लिपिक - नेवासा शाखा |
| १४ | शिवमती दीपमाला नीलेश पवार M.Com. | कनिष्ठ लिपिक - भिंगार शाखा |
| १५ | शिवश्री प्रभाकर बबनराव जेधे B.A. B.Ed. | कनिष्ठ लिपिक - पाथर्डी शाखा |
| १६ | शिवश्री दिलीप संपत खर्डे B.A. (Appeared) | कनिष्ठ लिपिक - संगमनेर शाखा |
| १७ | शिवमती मंजुश्री राजेश गुंजाळ B.Com. | कनिष्ठ लिपिक - संगमनेर शाखा |
| १८ | शिवश्री प्रशांत महादेव बोरुडे B.A. (Appeared) | कनिष्ठ लिपिक - मार्केट यार्ड शाखा |
| १९ | शिवमती रोहिणी रावसाहेब मुळे M.Sc.,B.Ed. | कनिष्ठ लिपिक - शेवगाव शाखा |
| २० | शिवश्री शुभम सुरेश केसभट Bcs. | कनिष्ठ लिपिक - शेवगाव शाखा |
| २१ | शिवश्री रोहन सखाराम सातपुते B.A. | कनिष्ठ लिपिक - पाथर्डी शाखा |
| २२ | शिवश्री नीलेश विष्णू जाधव B.A., (Appeared) | कनिष्ठ लिपीक - नेवासा शाखा |
| २३ | शिवश्री तेजस हेमंत कासार B.Com. | कनिष्ठ लिपीक - माळीवाडा शाखा |
| २४ | शिवश्री मनेष दिलीप रोहोकले S.S.C. | सहाय्यक - मार्केटयार्ड शाखा |
| २५ | शिवश्री अक्षय तान्हाजी डोंगरे H.S.C. | सहाय्यक - संगमनेर शाखा |

# २५ वा वार्षिक अहवाल २०२४-२५

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

आदरपूर्वक जय जिजाऊ !!

मराठा पतसंस्थेच्या यशस्वी रौप्यमहोत्सवी म्हणजे पंचविसाव्या अधिमंडळाच्या बैठकीमध्ये आपल्या सर्वांचे मनापासून आम्ही हार्दिक स्वागत करतो !

मागील वर्षापूर्वीची दोन वर्षे पतसंस्था चळवळीसाठी अतिशय खडतर गेली आहेत. आपल्या जिल्ह्यातील बऱ्याच पतसंस्था या डबघाईला आल्या आहेत. तसेच बुडितही निघाल्या आहेत. त्यामुळे सभासद व ठेवीदार यांच्या मनामध्ये पतसंस्थेविषयी अविश्वास निर्माण झाला आहे ही वस्तुस्थिती येथे नमूद करताना आम्हालाही खेद वाटत आहे. परंतु तीन वर्षांपूर्वी आपण सर्व सभासदांनी ज्या विश्वासाने आजच्या या संचालक मंडळाच्या हाती कार्यभाराची सूत्रे दिली. त्या विश्वासाने पात्र राहून हे संचालक मंडळ अतिशय जबाबदारीने व निष्ठेने सर्व सभासद व ठेवीदार यांच्याच भल्याचा विचार करीत आहे, हे आम्हांस अतिशय अभिमानाने नमूद करावेसे वाटते. या पार्श्वभूमीवर संचालक मंडळ तसेच अधिकारी व सर्व कर्मचारीवृंद अधिक सतर्क झाला आहे. पतसंस्था चळवळीतील सर्व समस्यांना सामोरे जाऊन पतसंस्थेने सर्व समाजात पत राखून ठेवली आहे व समाजाच्या दृष्टिकोनातून लक्षणीय प्रगतीही केलेली आहे. याचे संपूर्ण श्रेय आजी माजी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांचे सर्व शाखांतील व्यवस्थापक व सहकारी तसेच संचालक मंडळावर विश्वास ठेवून त्यांना मार्गदर्शन व विधायक सूचना करणारे सर्व आदरणीय सभासद, हितचिंतक, सामाजिक भान ठेवणारे सर्व स्तरातील नागरिक तसेच मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेड यांचे जिल्हा व तालुका पदाधिकारी व निरपेक्ष भावनेने काम करणारे कार्यकर्ते यांनाच जाते. या सर्वाचे आम्ही संचालक मंडळातर्फे अतिशय विनम्र भावनेने अभिनंदन करतो व कृतज्ञताही व्यक्त करतो. आपण दाखवलेल्या या विश्वासामुळे आमचाही कामकाजाचा उत्साह वाढला आहे व बघता बघता आपल्या पतसंस्थेने आता रौप्यमहोत्सवी वर्षात पाऊल टाकले आहे. दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या आपल्या पतसंस्थेचा आर्थिक वर्षाचा हिशेब व मराठा सेवा संघ प्रणीत मराठा पतसंस्थेचा अहवाल आपल्या समोर सादर करताना आम्हां संचालक मंडळास अतिशय आनंद व अभिमान वाटतो.

मराठा सेवा संघाची स्थापना दिनांक ३१ ऑगस्ट १९९० रोजी संस्थापक अध्यक्ष आदरणीय ॲड. पुरुषोत्तम खेडेकर व आपल्या जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील निवृत्त सनदी अधिकारी मा. निर्मलकुमार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली झाली. त्यानंतर गेली ३५ वर्षे या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचे काम अद्यावतपणे सुरू आहे. दरवर्षी १ सप्टेंबर हा मराठा सेवा संघाचा तसेच दिनांक १९ फेब्रुवारीला मराठा पतसंस्थेचा ' वर्धापन दिन ' आपण सर्वजण साजरा करत असतो. आपल्या पतसंस्थेची स्थापना दिनांक २५/१०/२००० रोजी अहिल्यानगर येथे झाली. महाराष्ट्र राज्याचे सहकार खात्याचे तत्कालीन राज्यमंत्री कै. ना. बाबासाहेब कुपेकर यांचे हस्ते पतसंस्थेचे उद्घाटन झाले. त्यानंतर पतसंस्थेच्या सर्व आजी/माजी संचालकांनी अविरत कष्ट घेऊन 'आपण समाजाचे देणे लागतो' या निरपेक्ष भावनेने काम करत योगदान दिले आहे. आतापर्यन्त या सर्व संचालकांच्या प्रती आम्ही ऋण व्यक्त करतो. गेल्या २५ वर्षांमध्ये पतसंस्थेने अनेकांना स्वतःच्या पायावर उभे केले आहे. अनेक तरुणांना देशात व परदेशात शिक्षणासाठी अर्थसहाय्य देऊन प्रवृत्त केले आहे. अनेकांना उद्योजक म्हणूनही समाजासमोर आणले. ज्यांना पत नाही, त्यांना अर्थसहाय्य करून समाजामध्ये पत मिळवून दिली आहे. हे सर्व मराठा सेवा संघाच्या परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून घडले आहे, याचा आम्हांस सार्थ अभिमान वाटतो.

गेली १० वर्षे मराठा समाजासाठी आपले सर्वस्व अर्पण केलेल्या वयोवृद्ध व्यक्तींचे कार्य समाजासमोर आणण्यासाठी मराठा पतसंस्था व मराठा सेवा संघ, अहिल्यानगर जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना 'जीवनगौरव' हा मानाचा पुरस्कार प्रदान करून त्यांच्या प्रती

कृतज्ञता व्यक्त करण्याचे कर्तव्य पतसंस्थेचे संचालक मंडळ पार पाडत आहे. त्याचबरोबर मागील वर्षापासून आपल्या समाजातील दोन यशस्वी तरुण उद्योजकांना 'मराठा युवा उद्योजक' पुरस्कार देऊन त्यांना उत्तेजन देण्याचे धोरण संचालक मंडळाने स्वीकारले आहे. या वर्षी संगमनेरचे पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आदरणीय **शिवश्री सोमनाथ कळसकर गुरुजी** (राष्ट्रपतिपदक विजेते) यांना व **शिवमती डॉ. विमलताई ढेरे** यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आपल्या जिल्ह्यातील शिवश्री संजय चव्हाण व शिवश्री राजेंद्र उदागे यांना युवा उद्योजक पुरस्कार प्रदान करून त्यांच्या पाठीवर थाप मारण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

पतसंस्थेचे कामकाज गतिमान करण्याच्या दृष्टिकोनातून आता पतसंस्थेने संगणक प्रणाली अद्यायावत केली आहे. त्यामुळे सभासदांना आता एटीएम सुविधा, ऑनलाईन व्यवहार तसेच आपल्या खात्यांची व शिल्लक रकमेची माहिती घेणे, सुट्टीच्या दिवशीही व्यवहार करणे या सर्व सुविधांचा वापर ॲपद्वारे करता येणार आहे. त्यामुळे व्यवहार पूर्णपणे पारदर्शक राहणार आहेत. सर्व शाखांमध्ये या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याबाबतचे कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे.

'झोपलेल्यांना जागे करणे, जागे झालेल्यांना चालायला शिकविणे, चालणाऱ्यांना पळायला शिकविणे व पळणाऱ्यांना इतरांना घेऊन पळायला लावणे' हा प्रबोधनाचा वसा घेतलेल्या मराठा सेवा संघाला साथ देण्यासाठी आपल्या पतसंस्थेने ऑनलाईन व्याख्यानमाला सुरू केली आहेत. या उपक्रमाचे सारथ्य पतसंस्थेचे संचालक शिवश्री किशोर मरकड व शिवमती राजश्री शितोळे समर्थपणे करीत आहेत. सामाजिक उपक्रमांमध्ये गुणवंतांचे कौतुक सोहळे, लोकमत सखीमंच, श्रावण सोहळा, शिवजयंती, जिजाऊ जयंती, छ. संभाजी महाराज जयंती, दीपावली उत्सव इत्यादी विविध क्षेत्रांतील अधिकारी व गुणवंत यांचेसमवेत साजरे केले जाऊन पतसंस्थेमार्फत त्याबाबत जनजागृती करण्याचे काम केले जात आहे, याचा संचालक मंडळास सार्थ अभिमान वाटतो.

मराठा पतसंस्थेने आता खऱ्या अर्थाने 'कात' टाकली आहे. सन २०२५–२६ हे आर्थिक वर्ष रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने या वर्षात विविध प्रकारच्या योजना आखून त्याची अंमलबजावणी पतसंस्थेमार्फत सुरू केली आहे. पतसंस्थेचा एकत्रित व्यवसाय या वर्षात रुपये १०० कोटींच्या वर नेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यासाठी पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या निर्णयाची अधिकारी व कर्मचारी वृंद कसोशीने अंमलबजावणी करीत आहेत. संगमनेर व नेवासा या शाखांचे कामकाज अतिशय उल्लेखनीय आहे. आम्ही त्यांचे विशेष अभिनंदन करतो. नेवासा येथे पतसंस्थेच्या मालकीची ५ गुंठे जागा असून तेथे स्वतःच्या मालकीची इमारत उभी करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.

या आर्थिक वर्षात संचालक मंडळाने विविध योजना आखल्या असून त्या पूर्ण करण्यासाठी व या समाजकार्याच्या जगन्नाथाच्या रथास जसे जमेल तसे सहकार्य करून हातभार लावावा व समाजाप्रती ऋण मानून निःस्वार्थी वृत्तीने योगदान देणाऱ्या या मराठा पतसंस्थेच्या प्रगतीसाठी आर्थिक सहकार्य करावे, अशी आम्ही नम्रपणे विनंती करतो. समाजातील सर्व थरांतील घटकांना प्राधान्याने कर्ज वितरण करताना संस्था जी तत्परता व आस्था दाखविते, तीच तत्परता व सकारात्मकता कर्जदारांनी वेळेवर कर्जाची परतफेड करताना दाखविली तर संस्था कमीत कमी कालावधीमध्ये सहज उद्दिष्टपूर्ती साध्य करेल, याची आम्हांस खात्री वाटते.

संपूर्ण संचालक मंडळ आणि निष्ठेने काम करणारे अधिकारी व कर्मचारी सदैव शंकानिरसन करण्यास आपल्या सेवेसाठी उपलब्ध आहेत. आपल्या निरंतर विश्वासास कोणत्याही परिस्थितीत संचालक मंडळ व कर्मचारी वृंदाकडून तडा जाणार नाही, अशी ग्वाही आम्ही विनम्रपणे देत आहोत. या निमित्ताने मराठा सेवा संघांचे जिल्हाध्यक्ष शिवश्री सुरेश इथापे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष शिवश्री राजेश परकाळे,विजयमार्गचे संपादक शिवश्री अतुल लहारे तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश कार्याध्यक्षा ॲड. राजश्री शितोळे, जिल्हाध्यक्षा शिवमती नंदिनी सोनाळे, जिल्हाध्यक्षा ॲड. स्वाती जाधव, त्यांचे सर्व सहकारी, पदाधिकारी हे पतसंस्थेच्या कामास नेहमी हातभार लावतात. त्यांचेबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन त्यांचेकडून आणखी भरीव सहकार्याची अपेक्षा करीत आहोत.

या अधिमंडळाच्या निमित्ताने एक विशेष घटना नमूद करावीशी वाटते, आपल्या अहिल्यानगर शहरामध्ये जिल्हाध्यक्ष शिवश्री सुरेश इथापे यांच्या पाठपुराव्याने अहिल्यानगर शहराचे आमदार माननीय शिवश्री संग्रामभैय्या जगताप, माजी आमदार स्मृतिशेष अरुणकाका जगताप






यांनी मराठा सेवा संघाच्या कार्यालयासाठी शहराच्या मध्यभागी १५ गुंठे जमीन उपलब्ध करुन दिली. तसेच तेथे कार्यालयाच्या इमारतीसाठी शिवश्री संग्रामभैय्या जगताप यांनी २५ लक्ष रुपये निधी उपलब्ध करून देऊन इमारतही उभी केली आहे. त्याबद्दल स्मृतिशेष अरुणकाका व संग्रामभैय्या यांचे मराठा सेवा संघ व मराठा पतसंस्थेच्या सर्व कार्यकर्ते व सभासद यांचे वतीने आभार मानतो.

सर्व सभासद, ठेवीदार, सर्व शाखांचे सल्लागार मंडळ तसेच सर्व हितचिंतकांचे पतसंस्थेवरील प्रेम, निष्ठा व अतूट विश्वास यापुढेही अढळ राहून भविष्यात जिजाऊ कृपेने वृद्धिंगत होईल व मराठा पतसंस्था राज्यामध्ये एक नावाजलेली संस्था म्हणून नावारूपास येईल अशी अपेक्षा बाळगतो.

**❊ सभासद**

पतसंस्थेचे दि. ३१/०३/२०२५ अखेर ५३०८ भागधारक सभासद आहेत.

**❊ भागभांडवल**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रक्कम रुपये एक कोटी आहे. दि. ३१/०३/२०२४ अखेर वसूल भागभांडवल रु. ५८,२२,२००.०० एवढे होते. अहवाल सालात भागभांडवलामध्ये रु. १५,८६,८००.०० इतकी वाढ झालेली आहे. दि. ३१/०३/२०२५ अखेर पतसंस्थेचे भागभांडवल रु. ७४,०९,०००.०० आहे.

**❊ राखीव व इतर निधी**

संस्थेकडे दि. ३१/०३/२०२५ अखेर रु. १,३४,९१,०९६.३८ इतका राखीव व इतर निधी आहे.

**❊ ठेवी**

दि. ३१/०३/२०२४ रोजी पतसंस्थेकडे रु. ४०,०२,२६,८०२.४३ एवढ्या एकूण ठेवी होत्या. अहवाल सालात त्यात रु. ११,९७,९८,२२३.१० इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२५ अखेर एकूण ठेवी रु. ५२,००,२५,०२५.५३ झालेल्या आहेत.

**❊ कर्ज वितरण**

दि. ३१/०३/२०२४ अखेर रु. २७,१८,५८,२५२.०२ एवढे कर्ज वितरण केलेले होते. अहवाल सालात त्यात रु. ७,२०,८२,३६३.०० इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२५ अखेर एकूण कर्ज वितरण रु. ३४,३९,४०,६१५.०२ झालेले आहे.

**❊ मालमत्ता**

दि.३१/३/२०२५ अखेर डेडस्टॉक, फर्निचर, संगणक इत्यादी रु. १०,५२,२०६.०० व नेवासा शाखा जागा रु. २५,९८,५४०.०० अशी एकूण रु. ३६,५०,७४६.०० संस्थेची मालमत्ता आहे.

**❊ संचालक मंडळ व नातेवाईक कर्जे**

महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम ७२ (२) अन्वये मा. संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांकडून दि. ३१/०३/२०२५ अखेर येणे कर्ज व थकबाकीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशील | अहवाल वर्षाअखेर येणे कर्ज रक्कम रुपये | थकित रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | संचालकांची कर्जे | – | – |
| २ | संचालकांचे नातेवाईक यांची कर्जे | ५,३१,४०३.०० | २,४५,७१७.०० |






### * अहवाल सालात झालेला नफा व नफा वाटणी :

पतसंस्थेला अहवाल सालात दि. ३१.०३.२०२५ अखेर रक्कम रुपये ११,५५,७९०.१९ निव्वळ नफा झालेला आहे. सभासदांना १२ टक्के व ५० हजार वसूल भागभांडवल धारण करणाऱ्या सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे. तसेच पुढीलप्रमाणे निव्वळ नफ्याची वाटणी करण्याची शिफारस मंडळाने केलेली आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी, ही विनंती.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १) | **राखीव निधी** (एकूण नफा रकमेच्या २५ टक्के) | २,८८,९४८.०० |
| २) | **लाभांश** (दि.३१/३/२०२४ वसूल भागभांडवल रक्कम रु.५८,२२,२००.०० वर १२ टक्के) | ६,९८,६६४.०० |
| ३) | **लाभांश** (५० हजार वसूल भागभांडवल धारण करणाऱ्या सभासदांना १५ टक्के लाभांश) | १५,८५६.०० |
| ४) | **धर्मादाय निधी** (एकूण नफा रकमेच्या १ टक्का) | ११,५५८.०० |
| ५) | **सभासद, कर्मचारी कल्याण निधी** (एकूण नफा रकमेच्या ५ टक्के) | ५७,७९०.०० |
| ६) | **इमारत निधी** | ८२,९७४.१९ |
| | **एकूण** | **११,५५,७९०.१९** |

### * शाखा कामकाज – संस्थेच्या एकूण मुख्य कार्यालयासह ८ शाखा आहेत. शाखेच्या ठेवी व कर्ज वितरणाची माहिती खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशील | ठेवी रु. | कर्ज वितरण रु. |
|---|---|---|---|
| १) | मुख्य कार्यालय | १४,२५,२८,५१७.४६ | ५,२८,९६,१७३.०० |
| २) | भिंगार | ३,१२,८२,१०७.७८ | ३,७५,९३,४३२.०० |
| ३) | संगमनेर | ७,८०,३१,८६८.३२ | ६,०८,८३,४२०.५२ |
| ४) | नेवासा | ७,०२,४४,७९८.८४ | ४,४२,९९,१४६.०० |
| ५) | पाथर्डी | २,३३,८८,८२९.७० | ३,४३,५२,३०३.५० |
| ६) | मार्केट यार्ड, अ.नगर | १४,४३,२३,७८४.२३ | ९,२६,१४,२००.०० |
| ७) | शेवगाव | २,०८,०६,६५९.०० | १,४६,२५,७६९.०० |
| ८) | कर्जत | ९४,१८,४६०.२० | ६६,७६,१७१.०० |
| | **एकूण** | **५२,००,२५,०२५.५३** | **३४,३९,४०,६१५.०२** |

### * ऋणनिर्देश :

आपल्या संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये सर्व आजी–माजी संचालकांचा तसेच सल्लागार व हितचिंतकांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाचा, सहकार्याचा आणि पाठिंब्याचा मोठा सहभाग आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. सातत्याने वृध्दिंगत होणाऱ्या ग्राहकांच्या विश्वासावर आणि सहकार्याबद्दल संस्थेने भरीव प्रगती व कामगिरी केलेली आहे. यापुढेही काळात संस्थेच्या भरभराटीसाठी आतापर्यंत आपण दिलेल्या सहकार्याव्यतिरिक्त अधिक सक्रिय सहभागाची, मार्गदर्शन व विधायक सूचनांनी आम्ही अपेक्षा करीत आहोत.

